जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार

०२.११.२०२६

वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: ४० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

राष्ट्रवादीच्या माजी मंत्र्याला पुन्हा मंत्रिपद मिळणार

अमित शाह यांची घेतली भेट, सुनेत्रा पवारांचीही मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठी घडामोड पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील एका माजी मंत्र्याचं लवकरच मंत्रिमंडळात कॅमबॅक होणार आहे. पक्षातील एका माजी मंत्र्याने आणि एका वरिष्ठ मंत्र्याने नुकतेच दिल्लीत महायुतीतील श्रेष्ठींची भेट घेतली. रविवारी रात्री दिल्लीत ही भेट झाल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेतृत्वाने संबंधित मंत्र्यांच्या पुनरागमनाला ग्रीन सिग्नल दिल्यानंतर त्या माजी मंत्र्याने दिल्लीत भाजप श्रेष्ठींची जाऊन भेट घेतली. संबंधित माजी मंत्र्यांसाठी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा



सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार यांनी गुरुवारी रात्री वर्षा निवासस्थानी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली. भेटीत आगामी मंत्रिमंडळ फेरबदलात राष्ट्रवादीच्या संबंधित नेत्याला सुनेत्रा पवारांकडे असलेल्या अतिरिक्त खात्याची जबाबदारी देण्यासाठी मुख्यमंत्र्यांना विनंती करण्यात आली, अशी माहिती समोर येत आहे. मंत्र्याला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे असलेल्या अतिरिक्त खात्याची जबाबदारी- सुनेत्रा पवार यांनी देखील संबंधित विषयाबाबत यापूर्वीच अमित शाह यांची भेट घेतली होती आणि त्यानंतर मुंबईत पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत याबाबत चर्चा पार पडली होती.

गुरुवारी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत वर्षा निवासस्थानी सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार, धनंजय मुंडे यांची भेट झाली होती. आज पुन्हा सायंकाळी ४ वाजता कोअर कमिटीची बैठक देवगिरी निवासस्थानी होणार आहे. ज्या माजी मंत्र्यांचे मंत्रिमंडळात पुनरागमन होईल. या सदर मंत्र्याला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे असलेल्या अतिरिक्त खात्याची जबाबदारी देण्यात येणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

गोकुळच्या सत्तासंघर्षात नवा 'लेटर बॉम्ब'!

शासकीय संचालकांची संख्या वाढवण्याच्या प्रस्तावाने कोल्हापूरच्या सहकार क्षेत्रात खळबळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

कोल्हापूर - कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या निवडणुकीमध्ये एकामागोमाग एक धक्कादायक घडामोडी घडत असताना आता आणखी एक लेटर बॉम्ब समोर आला आहे.

गोकुळ दूध संघाची निवडणूक सुरू असतानाच उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना १६ ऑक्टोबर रोजी लिहिलेलं पत्र सोशल मीडियामध्ये व्हायरल झालं आहे. या पत्रानंतर गोकुळच्या राजकारणासह कोल्हापूरच्या राजकारणामध्ये सुद्धा मोठी खळबळ उडाली आहे. या पत्राच्या माध्यमातून आता निवडून आलेल्या २५ संचालकांसह शासन नियुक्त तब्बल आठ संचालक वाढवण्यासाठी घाट घालण्यात येत आहे का? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे.



दोन ऐवजी चार शासकीय सदस्य नेमण्यात यावेत चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रामध्ये म्हटलं आहे की तीन हजार कोटींहून अधिक वार्षिक उलाढाल असलेल्या सहकार संस्थांवर दोन ऐवजी चार शासकीय सदस्य नेमण्यात यावेत.

त्यामुळे आता गोकुळ उलाढाल पाहता गोकुळमध्ये मागच्या दाराने शासन नियुक्त संचालक बसवण्याचा प्रयत्न आहे का? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे. सहकार संस्था अधिनियमात सुधारणा करण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव आणावा अशी विनंती करण्यात आली आहे.

इतकेच नव्हे तर चंद्रकांत पाटील यांनी या पत्रामध्ये शासन नियुक्त संचालकांना व्यापक अधिकार दिले जावेत अशी सुद्धा मागणी केली आहे. विशेष म्हणजे गोकुळसाठी १८ ऑक्टोबर रोजी मतदान पार पडलं आणि दुसऱ्या दिवशी मतमोजणी झाली. यामध्ये राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने दणदणीत यश मिळवताना १३ जागा जिंकल्या आहेत.

थोडक्यात

गडचिरोली पोलिस दलातील वाहनाने महिलेला चिरडलं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

गोंदिया - गोंदिया जिल्ह्यातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. गडचिरोली पोलिस दलातील पोलिस वाहनाने महिलेला चिरडल्याची धक्कादायक घटना घडलीय. या भीषण अपघातात महिलेचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. तर २ वर्षीय चिमुकला देखील गंभीर जखमी झाला आहे. गोंदिया-कोहमारा महामार्गावरील मुंडीपार येथे ही घटना घडली आहे. या घटनेनंतर गोरेगाव ग्रामीण रुग्णालयात मात्र तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया-कोहमारा राज्य महामार्गवरील मुंडीपार येथे गडचिरोली पोलीस दलातील पोलीस वाहनाने एका दुचाकीला मागेहून जोरदार धडक दिली.

कर्जतमध्ये १०० एकरावर 'अनंत आश्रय'

अनाथ, दिव्यांग आणि ज्येष्ठांसाठी वसाहत : पाच हजारांसाठी आयुष्यभराचा निवारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

कर्जत - अनाथ मुले, दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांना आयुष्यभर सुरक्षित निवारा, आरोग्यसेवा आणि सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी रिलायन्स फाऊंडेशनच्या वतीने कर्जत येथे 'नीता मुकेश अंबानी अनंत आश्रय' ही भव्य वसाहत उभारण्यात येणार आहे.

सुमारे १०० एकर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात पाच हजार रहिवाशांना कायमस्वरूपी निवारा मिळणार आहे.



रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्षा नीता अंबानी यांनी रविवारी या प्रकल्पाची घोषणा केली. तसेच कर्जत येथील जागेवर भूमिपूजन करून कामाचा औपचारिक शुभारंभ केला. हा प्रकल्प कायमस्वरूपी ना-नफा तत्त्वावर चालविण्यात येणार असून, आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतर टप्प्याटप्प्याने त्याची उभारणी केली जाणार आहे. 'अनंत आश्रय' हा माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या हृदयाला स्पर्श करणारा प्रकल्प आहे. अनाथ मुले, दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांना घर, काळजी आणि सुरक्षित निवारा मिळावा, हा यामागील उद्देश आहे. येथे रहिवाशांना वैद्यकीय उपचार, शिक्षण, रोजगार, मैत्री आणि स्वतःला व्यक्त करण्याच्या संधी मिळतील.

निसर्गाच्या सान्निध्यात त्यांना सन्मानाने आणि आनंदाने जगता येईल, असे नीता अंबानी यांनी सांगितले. आपल्या पश्चात दिव्यांग मुलांची काळजी कोण घेणार, या चिंतेत असलेल्या पालकांसाठी हा प्रकल्प दिलासादायक ठरेल. त्यांच्या मुलांना येथे स्वतःचे घर आणि कुटुंब मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

या वसाहतीचा लाभ परिसरातील नागरिकांनाही मिळणार असून, आरोग्यसेवा, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सुमारे १५ हजार लोकांचे एक मोठे कुटुंब येथे वास्तव्यास असेल, असा अंदाज आहे. समाजातील दुर्लक्षित आणि आयुष्यभर काळजीची गरज असलेल्या व्यक्तींना हक्काचे घर, सुरक्षितता आणि सन्मान मिळवून देणे, हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

लंडनहून गुपचूप पुण्यात आली : पुढे बंद फ्लॅटमध्ये मुग्धा देशमुखचा मृतदेह, चक्रावून सोडणारा धक्कादायक घटनाक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

पुणे - लंडन येथे एमबीएच्या शिक्षणासाठी गेलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील ३४ वर्षीय मुग्धा अविनाश देशमुख या तरुणीचा मृतदेह पिंपरी-चिंचवडजवळील गहुंजे येथील लोढा बेलमोंडो या आलिशान सोसायटीतील एका बंद फ्लॅटमध्ये कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली होती. जुलै २०२५ मध्ये लंडनला गेलेली मुग्धा दररोज घरच्यांशी संपर्कात होती, मात्र २३ ऑक्टोबर २०२६ रोजी आईशी शेवटचे बोलणे झाल्यानंतर तिचा संपर्क तुटला.



कुटुंबीयांनी लंडन येथील मैत्रिणीमार्फत चौकशी केली असता मुग्धाने ऑगस्टच्या शेवटीच लंडन सोडल्याची धक्कादायक माहिती समोर आली. ती भारतातच असल्याचे निश्चित झाल्यावर पालकांनी छत्रपती संभाजीनगरमधील उस्मानपुरा पोलीस ठाण्यात अपहरणाची तक्रार नोंदवली. पोलिसांच्या तांत्रिक तपासात तिचे लोकेशन गहुंजे येथील सोसायटीमध्ये दाखवले, जिथे बनावट चावीने फ्लॅट उघडला असता तिचा मृतदेह सापडला. शिरगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, शवविच्छेदन अहवाल आणि मोबाईलच्या तांत्रिक विश्लेषणानंतरच तिच्या मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल असं त्यांनी म्हटलं असून शिरगाव पोलीस सर्व शक्यता गृहीत धरून पुढील तपास करत आहेत.

अमेरिकेत निवासी भागात खासगी विमान कोसळले : ९ जणांचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

फ्लोरिडा - अमेरिकेतील फ्लोरिडा राज्यातील पाम बीच काउंटीमधील ग्रीनएकर्स परिसरात रविवारी दुपारी भीषण विमान अपघात झाला. ९ जणांना घेऊन जाणारे लियरजेट ६० हे व्यावसायिक विमान निवासी भागात कोसळले. या दुर्घटनेत विमानातील सर्व ९ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती अमेरिकेचे परिवहन सचिव शॉन डफी यांनी दिली.



टेक्सासहून बहामासकडे जात होते विमान मिळालेल्या माहितीनुसार, N७२२BD या नोंदणी क्रमांकाचे हे विमान LR६०२७१ LLC या कंपनीद्वारे चालवले जात होते. विमानाने टेक्सासमधील ऑस्टिन-बर्गस्ट्रॉम आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केले होते. ते बहामासमधील नॉर्थ एल्युथेरा विमानतळाकडे जात होते. स्थानिक वेळेनुसार दुपारी सुमारे १२:५० वाजता मिलिटरी ट्रेलजवळील एका मोबाइल होम कम्युनिटीच्या परिसरात विमान कोसळले. फ्लाइट ट्रॅकिंग डेटानुसार, विमान सुमारे ३५,००० फूट उंचीवरून अचानक वेगाने खाली येत होते. मात्र, विमानाचा वेगाने खाली येण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

धडकेनंतर भीषण आग; घरांचेही नुकसान विमान जमिनीवर आदळल्यानंतर मोठा स्फोट झाला आणि परिसरात आग पसरली. धडकेमुळे रस्त्यावर मोठा खड्डा पडला, तर विमानाचे अवशेष परिसरात विखुरले गेले. या दुर्घटनेत एका मोबाइल होमचे नुकसान झाले.



दिवाळीच्या तोंडावर व्यावसायिक गॅस सिलिंडर महागला : घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर स्थिर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरातही १० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या वाढीमुळे व्यावसायिक



सिलिंडरची किंमत आता २ हजार ८२० रुपये झाली आहे. सरकारी तेल कंपन्यांच्या माहितीनुसार, ही दरवाढ १ नोव्हेंबरपासून लागू झाली आहे. या सुधारित दरांमुळे हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्ससाठी स्वयंपाकाच्या इंधनाचा खर्च वाढणार आहे. दरम्यान, घरगुती एलपीजी सिलिंडरचे भाव मात्र स्थिर म्हणजेच कायम आहेत.

जागतिक ऊर्जा पुरवठ्यातील विस्कळीतपणा आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढलेल्या दरांमुळे जून महिन्यात किमतींनी उच्चांक गाठला होता. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात एलपीजी सिलिंडर दरात कपात करण्यात आली होती. फेब्रुवारी ते जून दरम्यान १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत १,३७३ रुपयांनी वाढून, १,७४०.५० रुपयांवरून थेट ३,११३.५० रुपयांवर पोहोचली होती. त्यामुळे जुलै आणि ऑगस्टमध्ये घट करण्यात आली. घरगुती एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचे दर कायम सर्वसामान्य कुटुंबांना १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलिंडरसाठी ९४२ रुपये मोजावे लागणार असून, ताज्या सुधारणेमध्ये यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. पश्चिम आशियातील संकटामुळे पुरवठा विस्कळीत झाल्याने आणि आंतरराष्ट्रीय ऊर्जेचा खर्च वाढल्यामुळे मार्च ते जून दरम्यान घरगुती स्वयंपाकाच्या गॅसच्या किमतीत प्रति सिलिंडर ८९ रुपयांची वाढ झाली होती. तसेच, पेट्रोल आणि डिझेलचे दरही स्थिर आहेत.

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त बेनोडा येथे न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूलची भव्य एकता रॅली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – भारताचे लोहपुरुष आणि अखंड भारताचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल आणि पोलीस स्टेशन बेनोडा शहीद यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले.

शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित ही रॅली बेनोडा पोलीस स्टेशन येथून सुरु होऊन गावातील प्रमुख मार्गांवरुन मार्गक्रमण करत शाळेपर्यंत पोहोचली. या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, सामाजिक सलोखा आणि देशप्रेमाचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विविध घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. उत्स्फूर्त सहभागातून विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकता आणि अखंडतेची भावना



जागृत करण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमात ठाणेदार विवेक देशमुख व पोलीस कर्मचारी, मुख्याध्यापक हर्षल झोड, एचओडी अश्विनी श्रीराव, शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी सहाय्यक शिक्षिका दीक्षा घोटकर यांनी प्रभावी भाषणातून सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या राष्ट्रप्रेम, एकात्मता आणि देशाच्या एकीकरणासाठी दिलेल्या योगदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच बेनोडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार व कर्मचाऱ्यांच्या मोलाच्या सहकार्याने हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

छत्तीसगडमधील शेतकऱ्यांनी घेतले जैविक शेतीचे धडे!

वडसावित्री ऑरगॅनिक्स व शेतकरी अनुराग यावलकर यांच्या शेताला भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – जैविक शेतीचा प्रसार, जमिनीचे आरोग्य संवर्धन आणि शाश्वत कृषी पद्धतींचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने छत्तीसगड राज्यातील बलौदाबाजार-भाटापारा जिल्ह्यातील शेतकरी व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी वरुड येथे अभ्यासदौरा केला.

या भेटीदरम्यान त्यांनी वडसावित्री ऑरगॅनिक्स जैविक निविष्ठा संसाधन व मार्गदर्शन केंद्र तसेच प्रगतिशील शेतकरी अनुराग यावलकर यांच्या शेताला भेट देऊन जैविक शेतीच्या विविध प्रयोगांची माहिती घेतली. पारंपरिक कृषी विकास योजना व जैविक शेती मिशनअंतर्गत आयोजित या शैक्षणिक अभ्यासदौऱ्याचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील जैविक शेतीचे तंत्रज्ञान प्रत्यक्ष समजून घेणे, जैविक निविष्ठांची निर्मिती व वापर जाणून घेणे आणि जमिनीचे आरोग्य टिकवून



ठेवण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा अभ्यास करणे हा होता.

मृदा परीक्षणातून समजले जमिनीच्या आरोग्याचे महत्त्व कर्मयोगी सॉइल डायनॅमिकचे राहुल खंडाळे यांनी मृदा परीक्षण आणि जमिनीच्या आरोग्य व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन केले. जमिनीतील अन्नद्रव्यांची उपलब्धता, मातीचा सामू (कि), सुपीकता आणि मातीच्या विविध गुणधर्मांचा पिकांच्या वाढीवर होणारा परिणाम त्यांनी समजावून सांगितला.

दर महिन्याच्या १५ व ३० तारखेला शेतकरी प्रशिक्षण वडसावित्री ऑरगॅनिक्स जैविक निविष्ठा संसाधन व मार्गदर्शन केंद्र, वरुड यांच्या वतीने दर महिन्याच्या १५ आणि ३० तारखेला शेतकऱ्यांसाठी शेतीविषयक प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. या प्रशिक्षणामध्ये जैविक शेतीची तत्त्वे, जैविक निविष्ठांची निर्मिती व वापर, मृदा आरोग्य संवर्धन, मित्र जिवाणू व मित्र बुरशींचे महत्त्व तसेच पिकांचे योग्य व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले जाते. शेतकऱ्यांना केवळ सैद्धांतिक माहिती न देता प्रत्यक्ष शेतीमध्ये उपयोगी पडणारे तंत्रज्ञान शिकविणे, स्थानिक संसाधनांचा योग्य वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि शाश्वत शेतीच्या पद्धतींचा प्रसार करणे हा या प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे. शेतकऱ्यांना आपले अनुभव, अडचणी आणि शेतीविषयक प्रश्न मांडण्यासाठीही या उपक्रमातून व्यासपीठ उपलब्ध होत आहे. छत्तीसगडच्या कृषी अधिकाऱ्यांची उपस्थिती या अभ्यास भेटी दरम्यान छत्तीसगड कृषी विभागाचे सीयाराम हिरवानी, थानेश्वर धुरंधर आणि ओम प्रकाश तसेच वरुड कृषी विभागाचे एल.जी.श्रीराव, बीटीएम उपस्थित होते. त्यांनी जैविक शेतीच्या विविध पद्धतींची माहिती घेतली आणि या उपक्रमाची कार्यपद्धती समजून घेतली.

जैविक शेतीच्या प्रसाराला मिळणार नवी दिशा शेतीचा उत्पादन खर्च, जमिनीची घटती सुपीकता, रासायनिक निविष्ठांचा वाढता वापर आणि पर्यावरणाचे संवर्धन ही आजच्या शेतीसमोरील महत्त्वाची आव्हाने आहेत.

अशा परिस्थितीत मृदा परीक्षण, जैविक निविष्ठांचा योग्य वापर आणि जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संवर्धन यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राष्ट्रीय एकता दिनाचा जागर : वरुडमध्ये एकता दौड उत्साहात!

वरुड पोलीस स्टेशन व स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – भारताचे लोहपुरुष आणि अखंड भारताचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स, वरुड आणि वरुड पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'एकता दौड'चे आयोजन करण्यात आले.





राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थी, पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे यांनी वरुड पोलीस स्टेशनचे ठाणेदार दिनेश चव्हाण यांना वृक्ष भेट देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यांच्या उपस्थितीत एकता दौडला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली.

एकता दौडला स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रांगणातून सुरुवात झाली. ही दौड वरुड येथील एस.टी.बसस्थानकापर्यंत काढण्यात आली. त्यानंतर बसस्थानकावरुन पुन्हा महाविद्यालयाच्या प्रांगणात दौडचा समारोप करण्यात आला. या दौडमध्ये एनएसएस विभागाचे विद्यार्थी, पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच प्राध्यापकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

या कार्यक्रमाला शांतता समिती सदस्य तथा वरुड नगरसेवक तारेश देशमुख, निलेश दुर्गे, स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य किशोर तडस, वरुड केसरी दैनिकाचे संपादक प्रवीण सावरकर, वरुड पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी, एनएसएस विभागाचे समन्वयक प्रा.राजकुमार वानखडे, महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या एकता दौडचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कविता बेहरे यांनी केले. यावेळी 'ऑपरेशन कवच, नशेला नकार, जीवनाचा स्वीकार' हा संदेशही देण्यात आला.

विविध भाषा, धर्म, जाती आणि संस्कृतींनी नटलेल्या भारताची एकात्मता टिकवून ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशाच्या एकीकरणासाठी दिलेले योगदान आणि त्यांचे राष्ट्रनिष्ठेचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत, विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश देणारी ही एकता दौड उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक ऐक्याचे महत्त्व अधोरेखित झाले.

जरुड येथे 'राष्ट्रीय एकता दिन' उत्साहात संपन्न

कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

जरुड – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित तथा श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'राष्ट्रीय एकता दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.



अखंड भारताचे शिल्पकार, तथा पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या देशाच्या एकीकरणासाठी असलेल्या अतुलनीय योगदानाचे स्मरण करण्यात आले तसेच राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव, सामाजिक सलोखा आणि देशाची अखंडता टिकवुन ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.जी.आर.तडस, डॉ.व्ही.एच.भटकर, डॉ.एस.व्ही.काळे, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, डॉ.पूजा मालपे, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, प्रा.समीक्षा बिडकर, प्रा.रेणुका वानखडे, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.लीलाधर चौधरी, प्रमोद पाटील, निलेश खुरद, अर्चना राऊत, संतोष चव्हाण, निलेश बंदे, अनिल हरले, दुर्गा हरले आदी प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयात

सरदार पटेल जयंती आणि आयर्न लेडी पुण्यतिथी साजरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

वरुड – स्थानिक स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे ३१ ऑक्टोबर हा दिवस स्वतंत्र भारताचे आणि स्वातंत्र्य चळवळीतील कणखर नेतृत्व, धडाडीचे निर्णय घेणाऱ्या दोन महापुरुष म्हणजे स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान म्हणुन असे लोहपुरुष सरदार



पटेल यांची जयंती आणि स्वतंत्र भारताचे आजपर्यंतचे पहिल्या महिला प्रधानमंत्री असे प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आले.

याप्रसंगी या दोन्ही महापुरुषांचे जीवनकार्य विचार मनोगतातून मुख्याध्यापक विजय आडे, उपमुख्याध्यापिका माधुरी मेश्राम, पर्यवेक्षक प्रशांत वडे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

यावेळी दोन्ही प्रतिमांचे पूजन अभिवादन करुन सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

संपादकीय

परिस्थिती कितीही कठीण असली तरी प्रयत्न करणे कधीही सोडू नका.

महायुतीच्या एकजुटीला तडे : सत्तेच्या राजकारणातील अंतर्विरोध चव्हाट्यावर!

विधान परिषद निवडणुकीनंतर महायुतीचे काचेचे भांडे तडकले आहे, यात शंका नाही. निवडणुकीनंतर हे तडकलेले भांडे पुन्हा जोडले जाते की पूर्णपणे फुटते, हे लवकरच स्पष्ट होईल. राजकारणात कोणतीही युती ही केवळ सत्तेच्या आकडेमोडीवर टिकत नसते, तर परस्पर विश्वास, समन्वय आणि एकमेकांच्या राजकीय अस्तित्वाचा आदर या गोष्टींवर तिचे भवितव्य अवलंबून असते. महाराष्ट्रातील महायुतीच्या राजकारणात विधान परिषद निवडणुकीनंतर निर्माण झालेली परिस्थिती याच प्रश्नांना पुन्हा ऐरणीवर आणणारी आहे. निवडणूक म्हणजे केवळ उमेदवार निवडून आणण्याची प्रक्रिया नसते, तर ती राजकीय पक्षांच्या संघटनशक्तीची, नेतृत्वाची आणि अंतर्गत एकजुटीचीही कसोटी असते. या निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीतील घटक पक्षांमधील समन्वयाबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. एकीकडे एकत्रितपणे सत्ता चालविण्याचा दावा केला जात असताना दुसरीकडे परस्परांतील राजकीय स्पर्धा आणि मतभेद समोर येत असतील, तर अशा परिस्थितीत युतीच्या स्थैर्याचा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. महायुतीमध्ये सहभागी असलेल्या प्रत्येक पक्षाची स्वतःची राजकीय महत्त्वाकांक्षा, संघटनात्मक ताकद आणि भविष्यातील राजकीय गणिते आहेत. त्यामुळे जागावाटप, उमेदवारी, नेतृत्व आणि सत्तेतील वाटा या मुद्द्यांवर मतभेद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, युतीधर्म पाळण्याची जबाबदारी सर्व घटक पक्षांची समान असते. केवळ निवडणुकीच्या वेळी एकत्र येणे आणि निकालानंतर एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करणे, ही भूमिका दीर्घकाळ टिकणाऱ्या राजकीय सहकार्याला पूरक ठरू शकत नाही. या संपूर्ण घडामोडींमध्ये सर्वांत महत्त्वाचा प्रश्न नेतृत्वाच्या समन्वयाचा आहे. घटक पक्षांच्या नेत्यांमध्ये संवादाचा अभाव असेल, निर्णयप्रक्रियेत सर्वांना समान महत्त्व मिळत नसेल किंवा राजकीय श्रेयवादाला अधिक महत्त्व दिले जात असेल, तर नाराजी वाढणे अपरिहार्य ठरते. ही नाराजी केवळ नेत्यांपुरती मर्यादित राहत नाही, तर कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचते. त्यातून स्थानिक पातळीवरही युतीच्या राजकारणाला वेगवेगळे संदर्भ प्राप्त होतात. महायुतीतील मतभेदांचे परिणाम आगामी निवडणुकांवरही होऊ शकतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असोत किंवा इतर राजकीय आव्हाने, प्रत्येक घटक पक्षाला आपले स्वतंत्र राजकीय अस्तित्व टिकवायचे आहे. त्यामुळे एकमेकांच्या मतदारसंघांत राजकीय ताकद वाढविण्याची स्पर्धा निर्माण होणे साहजिक आहे. परंतु ही स्पर्धा युतीच्या चौकटीत राहून हाताळली नाही, तर परस्परांवरील विश्वासाला धक्का बसू शकतो. दुसरीकडे, केवळ काही निवडणूक निकाल किंवा राजकीय नाराजी यावरून युती तुटणारच, असा निष्कर्ष काढणेही घाईचे ठरेल. भारतीय राजकारणात मतभेद आणि सत्तासहकार्य या दोन्ही गोष्टी अनेकदा एकाच वेळी सुरू असतात. राजकीय सोय, सत्तेतील सहभाग आणि व्यापक निवडणूक गणिते यांमुळे मतभेदांवर पडदा टाकून पुन्हा एकत्र येण्याचेही अनेक प्रसंग घडतात.



पाणी संपल्यावर विकासाचे इमले काय कामाचे?

निसर्गाच्या मर्यादा ओळखून विकासाचे नियोजन करणे म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे. उलट, विकास टिकाऊ बनवणे होय. हे सरकारने वेळीच लक्षात घ्यावे: पाणी संपल्यावर ना विकासाची जाहिरात तहान भागवू शकते, ना उद्योगपतींचा नफा, ना धार्मिक सोहळ्यांचा भव्यपणा!

सरकारच्या विकासाच्या मॉडेलला दुष्काळाचा आरसा दाखवण्याची वेळ आली आहे! पाण्याची टंचाई डोक्यावर येऊन ठेपली असताना बांधकामांचा वेग वाढवणारे, उद्योगांना पाणी देणारे आणि निसर्गाची कत्तल करणारे सरकार विकास करत नाही; ते भविष्यातील संकटाची पायाभरणी करत आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील नद्या, नाले आणि ओढ्यांची पातळी नेहमी फेब्रुवारी-मार्चमध्ये जितकी खाली जाते, तितकी ती यंदा त्याच्या कित्येक महिने आधीच खालावली असल्याची स्थिती असेल, तर हा केवळ चिंतेचा विषय नाही; तो गंभीर इशारा आहे. सरकारला या संकटाची जाणीव आहे का? की संकट प्रत्यक्ष दारात येऊन उभे राहिल्याशिवाय त्याची दखल घ्यायची नाही, हेच सरकारी धोरण आहे?

मुंबई आणि परिसरात बांधकामांचा धडाका सुरू आहे. नव्या इमारती, व्यावसायिक संकुले, पायाभूत सुविधा आणि वाढत्या शहरीकरणासाठी प्रचंड पाणी लागणार आहे. तरीही या वाढत्या मागणीचा उपलब्ध जलसाठ्याशी मेळ घातला जात आहे का? नव्या बांधकामांना परवानग्या देताना भविष्यातील पाणीपुरवठ्याचा ठोस हिशेब केला जातो का? की इमारती उभ्या करण्याची घाई आहे, पण त्यात राहणाऱ्या माणसांना पाणी कुठून देणार, याचे उत्तर नाही? विकासाच्या नावाखाली लोकसंख्या आणि पाण्याची मागणी वाढवत राहायची, पण पाणी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मात्र निसर्गावर सोपवायची, हा कसला विकास? उद्योगांचा नफा महत्त्वाचा की माणसांची तहान?

डेटा सेंटर, इथेनॉल निर्मिती, शीतपेय उद्योग, मद्यनिर्मिती, वस्त्रोद्योग अशा अनेक क्षेत्रांना पाणी लागते. प्रत्येक उद्योगाची पाण्याची गरज, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक योगदान वेगवेगळे असते. त्यामुळे सर्व उद्योग सरसकट बंद करावेत, असा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो पाण्याच्या वापरातील प्राधान्यक्रमाचा. पिण्याच्या पाण्याची



टंचाई निर्माण होण्याची शक्यता असताना कोणत्या उद्योगाला किती पाणी द्यायचे, कोणत्या उद्योगाने प्रक्रिया केलेले सांडपाणी पुन्हा वापरायचे आणि कोणत्या उत्पादनांवर तात्पुरते निर्बंध घालायचे, याचे धोरण सरकारकडे असायला नको का? शीतपेय, मद्य, वस्त्रोद्योग आणि इतर औद्योगिक उत्पादनांसाठी पाणी वापरले जात असताना सामान्य माणसाला मात्र पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले जाते. डेटा सेंटरसारख्या डिजिटल अर्थव्यवस्थेशी संबंधित सुविधांचेही नियोजन करताना त्यांच्या प्रत्यक्ष पाणीवापराचा, शीतकरणाच्या तंत्रज्ञानाचा आणि स्थानिक जलस्रोतांवरील परिणामाचा हिशेब आवश्यक आहे.

जंगलतोड करून विकासाचे प्रकल्प उभारायचे आणि नंतर पाऊस कमी पडल्यावर दुष्काळाचे रडगाणे गायचे, हा विरोधाभास आपण किती काळ सहन करणार? जंगले नष्ट करून पावसाची अपेक्षा कशी ठेवणार? जंगले स्थानिक जलचक्र, मातीतील ओलावा, भूजल पुनर्भरण आणि पर्यावरणीय समतोल टिकवण्यासाठी महत्त्वाची असतात. पावसावर अनेक घटकांचा परिणाम होतो. तरीही जंगलांचा नाश करून पर्यावरणीय स्थैर्य धोक्यात घालणे म्हणजे आपल्या जलसुरक्षेचाच पाया कमकुवत करणे होय.

लाखो भाविक एकत्र येणाऱ्या कुंभमेळ्यासारख्या प्रचंड आयोजनासाठी पिण्याचे पाणी, स्वच्छता, स्नानघाट आणि इतर सुविधांची मोठी व्यवस्था करावी लागते. एवढ्या मोठ्या आयोजनाचे नियोजन करताना स्थानिक नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर किती परिणाम होईल, याचे पारदर्शक मूल्यमापन आवश्यक नाही काय? धार्मिक श्रद्धेचा आदर असला, तरी पाण्याच्या मर्यादांकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार कोणालाही नाही.

मोठ्या आयोजनासाठी पाणी उपलब्ध करून देताना स्थानिक नागरिकांना टंचाईचा सामना करावा लागणार नाही, याची हमी सरकारने द्यायला हवी. पाणी किती उपलब्ध आहे, किती खर्च होणार आहे आणि त्याची भरपाई कशी केली जाणार आहे, हे जनतेला स्पष्टपणे सांगितले पाहिजे. पाण्याचे संकट गडद झाले की समुद्राचे खारे पाणी गोड करून वापरण्याचा पर्याय पुढे केला जातो. समुद्राच्या पाण्याचे क्षारीकरण दूर करणारे प्रकल्प निश्चितच उपयोगी ठरू शकतात. मात्र, ते सहजसाध्य किंवा सर्व समस्यांवरचा एकमेव उपाय नाहीत. समुद्राचे पाणी गोड केले तरी ते शेतीसाठी वापरणे आपोआप किफायतशीर ठरत नाही. पिकांचा प्रकार, पाण्याची गुणवत्ता, ऊर्जा खर्च आणि वाहतुकीचा खर्च यांचा विचार करावा लागतो. म्हणजेच, समुद्राचे पाणी गोड करण्याचा पर्याय उपलब्ध आहे म्हणून पाण्याचे संकट सुटले, असे समजणे मूर्खपणाचे ठरेल. त्यापेक्षा पावसाचे पाणी साठवणे, धरणांतील गळती कमी करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा औद्योगिक वापर वाढवणे, भूजलाचे पुनर्भरण करणे आणि शेतीत पाणीबचतीच्या पद्धतींचा विस्तार करणे या उपायांनाही तितकेच महत्त्व द्यावे लागेल.

मग यावर उपाय म्हणून सरकारने नेमके काय करायला हवे? पहिली गोष्ट म्हणजे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील सध्याचा जलसाठा, आगामी महिन्यांतील अपेक्षित मागणी आणि संभाव्य तूट यांचा पारदर्शक हिशेब जनतेसमोर ठेवावा. दुसरी गोष्ट म्हणजे पाणीटंचाईचा धोका असलेल्या भागांमध्ये नव्या बांधकामांना परवानगी देताना उपलब्ध पाण्याची क्षमता आणि विद्यमान नागरिकांच्या गरजा यांचा कठोरपणे विचार करावा. तिसरी गोष्ट म्हणजे मोठ्या उद्योगांच्या पाणीवापराचे लेखापरीक्षण करावे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर, पाणीबचतीचे तंत्रज्ञान आणि पाणीवापराच्या मर्यादा यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. चौथी गोष्ट म्हणजे जंगलतोड, पाणलोट क्षेत्रांचा ऱ्हास आणि नैसर्गिक जलस्रोतांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी कठोर पावले उचलावीत. पाचवी गोष्ट म्हणजे मोठ्या धार्मिक, पर्यटनविषयक किंवा व्यावसायिक आयोजनांसाठी स्वतंत्र जलनियोजन करावे. स्थानिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या हक्काला प्राधान्य द्यावे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची वाट न पाहता त्वरित कृती करावी.

कोरोनासारख्या संकटाने जगाला एक गोष्ट शिकवली की, संकटाची चाहूल लागलेली असताना दुर्लक्ष केले, तर नंतर त्याची किंमत अनेक पटींनी मोजावी लागते. पाण्याच्या बाबतीतही हाच नियम लागू होतो. संकटाची पूर्वसूचना मिळाल्यावर त्याचा अंदाज घेऊन वेळेत कृती करणे, हेच सुशासनाचे लक्षण आहे. आज पाणी उपलब्ध असताना त्याचा वापर कसा करायचा, भविष्यातील मागणी कशी भागवायची आणि नैसर्गिक जलस्रोत कसे जपायचे, हे ठरवणे ही सरकारची जबाबदारी आहे. नागरिकांनी पाणी वाया घालवू नये, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. पण नागरिकांनी बादलीतून आंघोळ करावी, नळ बंद ठेवावेत आणि पाण्याची बचत करावी, असे सांगण्यापूर्वी सरकारनेही उद्योग, बांधकामे आणि मोठ्या आयोजनांमधील पाण्याच्या वापराचा कठोर हिशेब द्यायला हवा. पाण्याच्या संकटाचा सर्वाधिक फटका गरीब आणि वंचित लोकांना बसण्याची शक्यता असते. सरकारने हे वास्तव समजून घेतले नाही, तर सिमेंटची जंगले वाढतील, उद्योगांचे उत्पादन वाढेल, मोठमोठे प्रकल्प उभे राहतील; पण त्या विकासाच्या मध्यभागी माणसाला प्यायला पाणी नसेल, तर त्या विकासाला अर्थ काय?

निसर्गाच्या मर्यादा ओळखून विकासाचे नियोजन करणे म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे. उलट, विकास टिकाऊ बनवणे होय. हे सरकारने वेळीच लक्षात घ्यावे: पाणी संपल्यावर ना विकासाची जाहिरात तहान भागवू शकते, ना उद्योगपतींचा नफा, ना धार्मिक सोहळ्यांचा भव्यपणा!

झाडांची कत्तल हा विकास नाही, तर विनाश!

महाराष्ट्राच्या विकासाची व्याख्या नेमकी काय? हजारो झाडे तोडणे, जैवविविधतेचा ऱ्हास करणे आणि भावी पिढ्यांच्या जगण्याचा आधार कमकुवत करणे, याला विकास म्हणायचे का? मुंबईजवळील कर्जत-भीमाशंकर परिसरात टोरंट कंपनीच्या प्रस्तावित विद्युत प्रकल्पासाठी ३३ हजार झाडे तोडली जात आहेत हा गंभीर चिंतेचा विषय आहे. या प्रकल्पाची पर्यावरणीय किंमत कोण चुकवणार आणि त्याचा लाभ नेमका कोणाला मिळणार, याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे.

ऊर्जा, उद्योग आणि पायाभूत सुविधांचा विकास महाराष्ट्रासाठी आवश्यक आहे. मात्र विकासासाठी पर्यावरणाचा विनाश अपरिहार्य आहे, हा सरकारी समज चुकीचा आहे. उद्योगांची गरज आणि निसर्गाचे संरक्षण यांचा समतोल साधणे ही सरकारची जबाबदारी



आहे. त्यामुळे कर्जत-भीमाशंकरमधील वृक्षतोडीचा प्रश्न केवळ एका प्रकल्पापुरता मर्यादित नसून विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा विनाश आवश्यकच आहे का? हा मूलभूत प्रश्न आहे.

सह्याद्रीच्या कुशीत वसलेला कर्जत-भीमाशंकर परिसर वनसंपदा, जलस्रोत आणि जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. वृक्ष पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत करतात, मातीची धूप रोखतात, तापमान नियंत्रित करतात आणि असंख्य वन्यजिवांना अधिवास देतात. हजारो झाडांची तोड झाल्यास त्याचे परिणाम प्रकल्पाच्या सीमांपुरते मर्यादित राहत नाहीत; संपूर्ण परिसंस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. मग या प्रकल्पासाठी ३३ हजार झाडे तोडण्याची परवानगी देताना पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करण्यात आला का? एखाद्या उद्योगाचा प्रकल्प पुढे नेण्यासाठी स्थानिक नागरिक आणि निसर्गानेच त्याची किंमत मोजावी, हे स्वीकारार्ह नाही. विकासाचा लाभ कोणाला मिळणार आणि पर्यावरणीय नुकसान कोणाच्या वाट्याला येणार, हा प्रश्न उपस्थित करणे म्हणजे विकासाला विरोध नव्हे; तो पर्यावरणीय न्यायाचा मुद्दा आहे. आरेचे जंगल आणि विकासाच्या दाव्यांमधील विरोधाभास मुंबईसाठी आरेचे जंगल हे हिरवाईचे, जैवविविधतेचे आणि वन्यजिवांच्या अधिवासाचे महत्त्वाचे केंद्र आहे. मेट्रो प्रकल्पासाठी आरेतील वृक्षतोडीचा निर्णय झाला, तेव्हा पर्यावरणप्रेमी, स्थानिक नागरिक आणि तरुणांनी त्याविरोधात आवाज उठवला. वृक्षतोडीच्या कार्यपद्धतीवरूनही सरकारच्या निर्णयप्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित झाले. सर्वोच्च न्यायालयानेही याची दखल घेतली होती. एखाद्या प्रकल्पाला विकासाचे नाव दिल्याने त्याचे पर्यावरणीय परिणाम दुर्लक्षित करता येत नाहीत. प्रकल्पांची संख्या, उद्घाटने आणि जाहिराती यांपेक्षा त्यांचा हवा, पाणी, जंगल आणि स्थानिक जीवनावर होणारा परिणाम महत्त्वाचा आहे.

इन्फ्रामॅन की डिझास्टरमॅन? देवेंद्र फडणवीस सरकार पायाभूत सुविधांच्या विस्तारावर भर देत आहे. मात्र महामार्ग, मेट्रो, विद्युत प्रकल्प आणि सिमेंट-काँक्रीटची बांधकामे उभारणे म्हणजेच सर्वांगीण विकास नव्हे. त्या विकासामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम रोखणे किंवा कमीत कमी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. इन्फ्रामॅन बनण्याच्या धडपडीत देवेंद्र फडणवीस पर्यावरणाच्या बाबतीत 'डिझास्टरमॅन' ठरत आहेत, अशी टीका करण्यास त्यांच्या सरकारच्या पर्यावरणविषयक निर्णयांमुळे वाव मिळतो. विकासाच्या जाहिरातींनी नष्ट झालेली वृक्षसंपदा परत मिळत नाही आणि बाधित झालेली परिसंस्था एका रात्रीत पूर्ववत होत नाही. पर्यावरण संरक्षणाची मागणी करणाऱ्यांना विकासविरोधी ठरवणे योग्य नाही.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

महात्मा फुले महाविद्यालयाच्या खुशी अमोदेचे वत्कृत्व स्पर्धेत दुहेरी यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान नागपूर आणि प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वत्कृत्व स्पर्धेत महात्मा फुले महाविद्यालय येथील विद्यार्थिनी खुशी शामराव अमोदे हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील इयत्ता बारावी कला शाखेत शिक्षण घेणाऱ्या खुशी अमोदे हिने जिल्हास्तरीय वत्कृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत ३ हजार रुपये रोख पारितोषिक मिळिवले. तसेच विभागीय स्तरावरील स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त करून ५ हजार रुपये रोख पारितोषिक आणि सन्मानपत्र मिळविले. तिच्या या दुहेरी यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक यशाच्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांनी तिचे कौतुक करुन अभिनंदन केले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका अलका पवार, मार्गदर्शक शिक्षक डॉ.चतुरभुज कदम, प्रा.रवींद्र वैद्य आणि प्रा.सुजाता खंडारे उपस्थित होते.

खुशी अमोदे हिला वत्कृत्व स्पर्धेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही यावेळी कौतुक करण्यात आले. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शेंदुरजनाघाटची पहाट दत्तनामाच्या गजराने भक्तिमय!

कोजागिरी पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत महिनाभर दत्ताच्या दिंडीची अखंड परंपरा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





शेंदुरजनाघाट – पहाटेची शांत वेळ, वीणा, टाळ आणि मृदंगाचा निनाद, मुखातून निघणारा दत्तनामाचा व विठ्ठलनामाचा गजर आणि भक्तिरसात न्हाऊन निघणारे संपूर्ण गाव असे भक्तिमय वातावरण सध्या शेंदुरजनाघाट शहरात अनुभवायला मिळत आहे.

शहरात वर्षानुवर्षे सुरु असलेली पहाटेची दत्ताची दिंडी यंदाही कोजागिरी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवसापासून उत्साहात सुरु झाली आहे. २६ ऑक्टोबरपासून दररोज पहाटे ५ वाजता या दिंडीला सुरुवात होत असून, कार्तिक पौर्णिमेपर्यंत म्हणजेच २४ नोव्हेंबरपर्यंत सलग ३० दिवस ही धार्मिक परंपरा सुरु राहणार आहे. पहाटेच्या मंगलमय वातावरणात दत्तनाम आणि विठ्ठलनामाचा गजर करीत वारकरी शहरातील विविध मार्गांवरुन मार्गक्रमण करतात. त्यामुळे शहरातील दिवसाची सुरुवातच भक्तिमय वातावरणात होत आहे.

तरुणाईसह चिमुकल्यांचाही वाढता सहभाग विशेष म्हणजे या दिंडीमध्ये आता तरुणाईसह लहान मुलांचाही सहभाग वाढत आहे. पूर्वी या दिंडीत प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग असायचा. त्यांच्या गळ्यातील टाळ, वीणा आणि मृदंगाच्या साथीने ही परंपरा पुढे जात होती. मात्र, कालांतराने ही परंपरा खंडित होण्याची भीती व्यक्त केली जात होती.

कार्तिक पौर्णिमेला दिंडीची सांगता महिनाभर सुरु असलेल्या या भक्तिमय उपक्रमाची सांगता कार्तिक पौर्णिमेला होणार आहे. कार्तिक पौर्णिमेच्या आदल्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सायंकाळी शहरातून भव्य शोभायात्रा काढून महिनाभर चाललेल्या दत्ताच्या दिंडीची सांगता केली जाते.

